स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२०२६–२७/३४ दि. १४/०५/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : उष्णतेच्या लाटेपासून विद्यार्थी व नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजनाबाबत..
संदर्भ : मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांचा दि. १२/०५/२०२६ रोजीचा मेल

महोदय,

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांच्या पत्रानुसार राज्य शासनाकडून प्राप्त सूचनेनुसार भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या हंगामी उष्णतेच्या इशाऱ्यानुसार पुढील काही महिन्यामध्ये सामान्यापेक्षा जास्त तापमान राहणार असल्याचे अवगत केले आहे.

त्यानुसार आपण आपल्या महाविद्यालय व परिसरामध्ये उपक्रम राबवित असताना विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षेकत्तर कर्मचारी यांची उष्णतेच्या लाटेच्या प्रतिकूल परिणामांपासून संरक्षणाकरिता उपाययोजना व योग्य ती दक्षता घेण्यात यावी. तसेच सद्यपरिस्थितीबाबत नागरिकांमध्ये जनजागृती, स्थानिक पातळीवर पत्रके व माहिती फलकांचा आणि प्रसारमाध्यमांचा वापर करावा आणि उचित कार्यवाहीकरून त्याचा अहवाल nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर 'उष्णतेच्या लाटेपासून संरक्षण व उपाययोजना' या विषयासह पाठवण्यात यावा. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

Bhame.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत: मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांचे पत्र

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

(आपत्ती व्यवस्थापन शाखा)

**दुरध्वनी क्र. ०२० २६१२३३७१** **टोल फ्री : १०७७** **E-Mail- controlroompune@gmail.com**

**जावक क्र. आव्यप्रा/ १८४/२०२६** **दिनांक : २९/०४/२०२६**

**वाचा :** राज्य शासन यांचे पत्र मंनिक २०२६/प.क्र. ४१/मंनिक २. दि. ०६/०४/२०२६

## परिपत्रक

### उष्णतेच्या लाटेपासून कामगार व नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना

राज्य शासनाकडून प्राप्त सूचनेनुसार भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या हंगामी उष्णतेच्या इशा-यानुसार पुढील काही महिन्यांत सामान्यापेक्ष जास्त तापमान राहणार असल्याचे अवगत केले आहे. अत्यंत उष्णतेच्या लाटेच्या परिस्थितीत सर्वाधिक त्रास सहन करणारे कामगार आणि मजूर आहेत. या कामगारांना उष्णतेच्या लाटेच्या प्रतिकूल परिणामांपासून संरक्षण देण्यासाठी बहु- क्षेत्रीय उपाययोजना राबविणे आवश्यक असल्याचे राज्य शासनाने कळविले आहे.

**या अनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:**

**कामगार व उद्योग क्षेत्रासाठी :**

1. कामगारांचे कामाचे तास पुन्हा नियोजित करणे, विशेषतः दुपारच्या उष्णतेत काम टाळणे.
2. आवश्यकतेनुसार कामाचा वेग कमी करण्याची परवानगी देणे.
3. पुरेसे पिण्याचे पाणी, विश्रांती क्षेत्रे व थंडावा मिळेल अशी व्यवस्था करणे.
4. आपत्कालीन बर्फ पंक व उष्णता प्रतिबंधक साहित्य उपलब्ध करुन देणे.
5. आरोग्य विभागाशी समन्वय साधून कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करणे.

**कारखाने व खाणी व्यवस्थापनासाठी :**

1. कामगारांना सर्वाधिक उष्णतेच्या वेळेत विश्रांती देणे.
2. दोन व्यक्तीच्या गटाने काम करण्याची व्यवस्था करणे.
3. इलेक्ट्रोलाइट पूरक पेय उपलब्ध करुन देणे.
4. कामगारांना उष्णतेच्या धोका व उपाययोनांबाबत जागरुक करणे.

**विशेष लक्ष देण्याचे गट :**

1. बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, रोजंदारी मजूर व असंघटीत क्षेत्रातील कामगार.
2. जनजागृतीसाठी पोस्टर, बॅनर व श्रमिक चौकांवर मोहिमा आयोजित करणे.

**अतिरीक्त सूचना- ग्रामसभा व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी :**

1. उन्हाळ्यात सुरू असलेल्या ग्रामसभा व धार्मिक/ सांस्कृतिक मिरवणुका यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्ती करुन आवश्यक उपचार साहित्य व उपाययोजना उपलब्ध कराव्यात.
2. प्रक्रिया व कार्यक्रमांचे वेळापत्रक उष्णतेच्या उच्चांक काळात बदलण्याची शक्यता तपासावी.
3. प्रत्येक ठराविक लोकसंख्येच्या गटासाठी थंडावा मिळेल अशी विश्रांती क्षेत्रे ***(Cooling Areas)*** अनिवार्यपणे उभारावीत.
4. यात्रांमध्ये पुरेसे पिण्याचे पाणी व इलेक्ट्रोलाइट पेय उपलब्ध करुन घ्यावे.
5. जनजागृतीमध्ये स्थानिक पातळीवर पत्रके व माहिती फलकांचा आणि प्रसारमाध्यमांचा वापर करावा.

वरील सूचनांचे अवलोकन करुन त्याचा आपल्या अधिनिस्त सर्व कार्यालय, अधिनिस्त क्षेत्र त्याठिकाणी जास्तीत जास्त प्रचार व प्रसार करण्यात यावा आणि उचित कार्यवाही करून त्याचा अहवाल या कार्यालास सादर करावा.

jitendra

**(जितेंद्र डूडी )**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.**

**प्रति,**

1. मा.आयुक्त, महानगरपालिका, पुणे
2. मा.आयुक्त, महानगरपालिका, पिंपरी चिंचवड, पुणे.
3. मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
4. मा.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, पुणे.
5. मा.आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.
6. पोलीस अधिक्षक, ग्रामीण पुणे.
7. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
8. कमांडन्ट, ५**th Bt**, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल, सदुंबरे,ता. मावळ.
9. विंग कमांडर, एअरपोर्ट अथोरिटी, लोहगाव, पुणे.
10. उप वन संरक्षण अधिकारी, पुणे/जुन्नर
11. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे/खडकी/देहु छावणी परिषद.
12. जिल्हा शल्य चिकित्सक, औंध, पुणे.
13. अधिक्षक अभियंता पाटबंधारे मंडळ पुणे.
14. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ पुणे.
15. अप्पर संचालक 1/2/3, औद्योगीक सुरक्षा, पुणे.
16. संचालक, हवामान विभाग, शिवाजी नगर, पुणे.
17. महानिदर्शक, पूर्वानुमान मौसम विभाग, शिवाजीनगर, पुणे.
18. संचालक, आकाशवाणी, शिवाजीनगर, पुणे.
19. संचालक, दूरदर्शन, शिवाजीनगर, पुणे.
20. सह संचालक, अन्न औषध प्रशासन, पुणे.
21. सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, येरवडा, पुणे.
22. उपआयुक्त, पशुसंवर्धन विभाग, पुणे.
23. उपआयुक्त, मत्स्य व्यवसाय, पुणे.
24. उपजिल्हाधिकारी, रोजगार हमी योजना, पुणे.
25. जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे.
26. उपविभागीय अधिकारी, (सर्व) ----------------------
27. तहसिलदार (सर्व)-------------------
28. मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत (सर्व) --------------------
29. अन्न धान्य वितरण अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
30. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे.

**31.** अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.क., पुणे शहर, गणेशखिंड,पुणे.
**32.** अधिक्षक अभियंता, म.रा.वि.वि.क., पुणे ग्रामिण.
**33.** अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे.
**34.** अधिक्षक अभियंता, यांत्रिकी मंडळ, पुणे.
**35.** जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, शिवाजीनगर, पुणे
**36.** कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे.
**37.** कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे विभाग, सिंचन भवन, पुणे.
**38.** कार्यकारी अभियंता, उजनी धरण व्यवस्थापन विभाग, पुणे.
**39.** कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगाव, पुणे.
**40.** कार्यकारी अभियंता, डिंभे धरण विभाग, मंचर, पुणे.
**41.** कार्यकारी अभियंता, खोरे समरूपण विभाग, पुणे.
**42.** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पुर्व / उत्तर / दक्षिण) विभाग, पुणे
**43.** कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, पुणे विभाग, पुणे.
**44.** कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, पुणे.
**45.** कार्यकारी अभियंता, छोटे पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, पुणे.
**46.** प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळ, वाकडेवाडी, पुणे.
**47.** प्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुणे.
**48.** व्यवस्थापक, मध्य रेल्वे, पुणे.
**49.** व्यवस्थापक, भारत संचार निगम लिमिटेड, पुणे विभाग, पुणे.
**50.** विभागीय व्यवस्थापक, महराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, पुणे.
**51.** व्यवस्थापक, पुणे मेट्रो, पुणे.
**52.** उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगमवाडी, पुणे.
**53.** जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
**54.** जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे.
**55.** अधिष्ठाता, ससुन सर्वोपचार रुग्णालय, पुणे.
**56.** वरिष्ठ भु-वैज्ञानिक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, शिवाजीनगर, पुणे.
**57.** शिक्षणाधिकारी, (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे
**58.** उपनियंत्रक, नागरी संरक्षण दल, नवीन प्रशासकीय इमारत, विधानभवन समोर, पुणे.
**59.** आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, पुणे/पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
**60.** मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे/पिंपरी चिंचवड महानगरपालिका/**PMRDA.**
**61.** समादेशक, जिल्हा होमगार्ड, पुणे.
**62.** ग्रुप कमांडर, नॅशनल कॅडेट क्रॉप, पुणे विद्यापीठ, पुणे.
**63.** समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, पुणे विद्यापीठ, पुणे.
**64.** जिल्हा समन्वयक, नेहरू युवा केंद्र संघटन,रास्ता पेठ, पुणे.
**65.** उपआयुक्त, कामगार कल्याण, वाकडेवाडी, पुणे.

**२/- सहाय्यक कामगार आयुक्त, पुणे यांनी वरील दिलेल्या सूचनेप्रमाणे सर्व विभागांशी समन्वय करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करण्यात यावा.**

**प्रत: मा. विभागीय आयुक्त, पुणे यांस माहितीस्तव सविनय सादर.**